**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग/महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून घेण्यात येणा-या भारतीय प्रशासकीय सेवा तसेच राज्य प्रशासकिय सेवा स्पर्धा पूर्व परिक्षांसाठी प्रशिक्षण देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन शुद्धीपत्र क्रमांकः प्रशिक्षण-२०१९/प्र.क्र. २१/का.-०९**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०० ०३२
तारीख: ३० ऑगस्ट, २०१९

<u>वाचा -</u>

१. शासन निर्णय क्रमांकः प्रशिक्षण-२०१२/प्र.क्र. १५८(भाग-२)/का.-१७, दि. १५ जुलै, २०१४.
२. शासन शुध्दीपत्र क्रमांक: प्रशिक्षण-२०१९/प्र.क्र.२१/का. -०९, दिनांक २५ मार्च, २०१९.

<u>प्रस्तावना-</u>

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे प्रशासकिय सेवा परिक्षांमध्ये उत्तीर्ण होण्याचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेत फारच कमी आहे. आदिवासी समाजाची सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती ही कमकुवत असल्यामुळे या समाजातील शिक्षित विद्यार्थी प्रशासकिय सेवांकिरता आवश्यक प्रशिक्षणाअभावी संघ लोकसेवा आयोग / महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशासकिय सेवा स्पर्धा परिक्षांकरिता पात्र ठरु शकत नाहीत. त्यामुळे राज्यातील ८ विद्यापिठांमध्ये प्रत्येकी २५ व यशदा, पुणे येथे १० अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग / महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशासकिय सेवा स्पर्धा परिक्षांकरिता ८ महिन्याचे स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण देण्यास दिनांक १५.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. दिनांक २५.०३.२०१९ रोजीच्या शासन शुद्धिपत्रकाद्वारे सदर प्रशिक्षणाचा कालावधी ८ महिन्याहून ११ महिने इतका करण्यात आलेला आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याकरिता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून होणारी खर्चात वाढ करण्याची मागणी विचारात घेऊन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सुधारित खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शुध्दीपत्र-</u>

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना संघ लोकसेवा आयोग / महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशासकिय सेवा स्पर्धा परिक्षांकरिता प्रशिक्षण देण्याकरिता दिनांक १५ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील प्रपत्र-अ मधील बाब निहाय सुधारित वार्षिक रु.३३४.२९७ लक्ष ( अक्षरी रुपये तीन कोटी चौतीस लाख एकोणतीस हजार सातशे फक्त ) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन शुद्धीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०८३०१६१२५२०३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Waje Prakash Vijay

Digitally signed by Waje Prakash Vijay
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1b4b695a8c26d140fc5c049d281eedbf23beed9a89ad7526416132cf28f14776, serialNumber=400892e5e82479e4f3c8cf46538dc917b7071e979796d37178d3b709e19155ab, cn=Waje Prakash Vijay
Date: 2019.08.30 16:24:53 +05'30'

(प्रकाश वि. वाजे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
२) मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव.
३) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन संस्था पुणे.
६) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे
७) कुलसचिव, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, विद्यापीठ, पुणे
८) कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
९) कुलसचिव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
१०) कुलसचिव,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
११) कुलसचिव,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
१२) कुलसचिव,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर
१३) कुलसचिव,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
१४) कुलसचिव,सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
१५) कुलसचिव,मुंबई विद्यापीठ, मुंबई
१६) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१७) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१८) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, नागपूर, अमरावती.
१९) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
२१) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई - ३२.
२२) संचालक, लेखापरिक्षा, ऑफिस ऑफ दि डायरेक्टर, ऑडिट सायंटिफिक अॅन्ड कमर्शियल डिपार्टमेंट,१०१,महर्षि कर्वे रोड,मुंबई-४०० ०२०.
२३) निवडनस्ती, कार्यासन-०९, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

## प्रपत्र-अ

| अ.क्र | खर्चाच्या बाबी | २५ प्रशिक्षणार्थींच्या प्रति तुकडीसाठी ११ महिने खर्च रुपये (लक्ष) | २२५ प्रशिक्षणार्थींच्या प्रति तुकडीसाठी ११ महिने खर्च रुपये (लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन ( प्रति प्रशिक्षणार्थी रु. ६०००X २५ प्रशिक्षणार्थी X ११ महिने ( निवास व भोजन खर्चासह ) | १६.५० | १४८.५ |
| २ | लेखन सामुग्री | ०.५५ | ४.९५ |
| ३ | व्याख्याते / प्रशिक्षकांचे मानधन | ६.०० | ५४.०० |
| ४ | आवश्यक वर्तमानपत्रे / मासिके / पुस्तके / वाचन साहित्य | ०.७५ | ६.७५ |
| ५ | प्रशिक्षणार्थ्यांना पुस्तकाचा संच देणे | १.५० | १३.५० |
| ६ | प्रशिक्षणार्थ्यांना इंटरनेटसह संगणक सुविधा पुरविणे | ०.७५ | ६.७५ |
| ७ | कर्मचाऱ्यांचे मानधन व इतर तदनुषंगिक खर्च | ३.७५ | ३३.७५ |
| ८ | आकस्मिक खर्च | १.०० | ९.०० |
| ९ | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना एकूण खर्चाच्या १३ % रक्कम प्रशासकिय व इतर खर्चासाठी देणे | ४.००४ | ३६.०३६ |
|  | **( अ ) एकूण प्रशिक्षण खर्च ( खर्च )** | ३४.८०४ | ३१३.२३६ |
| १० | (ब )यशदा, पुणे येथील १० प्रशिक्षणार्थींचा ११ महिन्यांचा खर्च | -- | २१.०६१ |
| **एकूण (अ) + (ब) वार्षिक खर्च** |  | ३४.८०४ | ३३४.२९७ |